**नियमित दिवाणी दावा क्र. १०४/२०१९ मधील निशाणी क्र. ५९ वरील आदेश**
**( सीएनआर क्रमांक एमएचएस२३००१८०२२०१९**
( शिवाजी भोसले व इतर वि. पांडुरंग भोसले व इतर)

सदरचा अर्ज प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी प्रतिवादी क्रमांक ४ याच्या उलट दाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला दोन महिने पंधरा दिवसांचा उशिर माफ होवुन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. अर्ज व म्हणणे वाचले.प्रतिवादीच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. प्रकरणाचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुत दावा वाटपासाठी, निरंतर मनाई हुकुमासाठी व ठरावासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्रमांक ४ यांनी सदर दाव्यात उलटदावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी प्रतिवादी क्रमांक ४ यांच्या उलटदाव्याला कैफियत दाखल केली नाही. प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी प्रतिवादी क्रमांक १ वयस्कर असुन आजारी असतात व त्यांनी कागदपत्र मिळुवुन कैफियत दाखल कण्यास उशिर झाल्याचे कथन केले आहे. अर्जामध्ये नमूद करण्यात आलेले कारण संयुक्तीक आहे. तसेच प्रकरणातील पक्षकारांमध्ये असलेल्या वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्यासाठी व नैसर्गिक न्यायाच्या दष्टीने दोन्ही पक्षकारांना पूर्ण संधी देणे न्यायोचित होणर आहे. तरी प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांना प्रतिवादी क्रमांक ४ च्या उलट दाव्याला कैफियत दाखल करण्यास झालेला दोन महिने व पंधरा दिवसांचा विलंब माफ करुन कैफियत दाखल करुन घेणे न्यायोचित होणार आहे. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांना प्रतिवादी क्रमांक ४ च्या उलट दाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला दोन महिने पंधरा दिवसांचा विलंब माफ करण्यात येतो व त्यांना कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

NANAWARE MOHINI DATTATRAY
Digitally signed by NANAWARE MOHINI DATTATRAY
Date: 2025.06.27 11:27:01 +0530

स्थळः— इगतपुरी
दिनांकः— २५/०६/२०२५

( मो. द. ननवरे )
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
इगतपुरी.